# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/01/2022 (सोमवार)

(दुपार)

---

### चोरी

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील मौजा वरोडा बसस्टॉपचे रोडचे बाजुला असलेले (चहा पानठेला दुकान) येथे दिनांक 15/01/2022 चे 21.00 वा. ते 16/01/2022 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सिंधु ईश्वर पारसे वय 36 वर्षे रा. वरोडा ता कळमेश्वर यांचे पानठेला दुकानाचे दाराचे अज्ञात आरोपीने कुलुप कोंडा तोडुन दुकानत प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानामध्ये ठेवलेले 1) सिलेंडर किंमत 3,000/–रु., 2) शेगडी किंमत 3,000/–रु., 3) व्हेपर्स ची किंमत 2,000/–रु., 4) 4 प्लॉस्टीक स्टुल कि. 1,000/–रु., 5) चाय थर्मास कि. 1,000/–रु. व 6) सिगरेटचे 4 नग पॅकेट किंमत 200/–रु. असा एकुण कि. 10,200/– रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पाली मो.क्र. 9284354630 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील आशा पुरा आरा मशीन कांद्री बस स्टॉप जवळ येथे दिनांक 15/01/2022 चे 20.30 वा. ते 16/01/2022 चे 05.30 वा. दरम्यान ट्रक चालक फिर्यादी नामे– रामप्रसाद नागोजी पार्धी वय 54 वर्श रा.शंकर नगर कांद्री वार्ड क्रं. 6 कन्हान याने ट्रकमध्ये अंदाजे 25 टन कोळसा भरून बुरहानपुर येथे घेवुन जाण्यासाठी कोळसाने भरून उभा करून ठेवलेला ट्रक लॉक केलेला होता. ट्रक क्रं. एमएच–40/एके– 2419 किं.8,50,000/–रू. व कोळसा अंदाजे 25 टन किं. 1,50,000/–रू. असा एकुण कि. 10,00,000/–रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सुरजुसे मो.क्र. 7666640218 हे करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. कन्हान :— दिनांक 15/01/2022 चे 20.30 वा. ते 20.45 वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय 36 वर्ष ही घरात स्वयंपाक करीत असतांना आरोपी नामे— अनंता नागोराव साखरे वय 40 वर्ष रा. कांद्री वार्ड क्रं. 3 कन्हान हा मागुन आला आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तेव्हा फिर्यादी ओरडली असता मुलगा धावुन आला असता त्याला सुदधा आरोपीने हातबुक्कीने मारहाण केली व फिर्यादीस गालावर मारले व अश्लिल शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ब), 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सुरजुसे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर